दैनिक
अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार
# रायगड नगरी
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित
• वर्ष १७ वे • अंक २२१ • MAHMAR/2006/17212 • रायगड • शुक्रवार दि.११ नोव्हेंबर २०२२ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

### स्थानिक व प्रकल्पग्रस्तांना नोकरीत समावेशनाबाबत

# जेएनपीए बंदरात मनसेचे गेट बंद आंदोलन

**दै.रायगड नगरी । उरण**

**उरण तालुक्यातील स्थानिक व प्रकल्पग्रस्त रहिवाशांना नोकरीमध्ये सामावून घेण्यात यावे,तसेच कोळी बांधवांना न्याय मिळावा या उद्देशाने उरण तालुका महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी जेएनपीए बंदराच्या अंतर्गत येणाऱ्या चौथ्या पोर्टच्या प्रवेशद्वारावर धडक देत ग गेट बंद आंदोलन छेडले होते. मनसेच्या या आंदोलनामुळे जेएनपीए रस्त्यावर तीन तास मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडीची समस्या निर्माण झाली होती.**



महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते राज ठाकरे यांच्या आदेशानुसार उरण तालुक्यातील स्थानिक, प्रकल्पग्रस्त तरुणांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यासाठी तसेच सततच्या समुद्रात होणाऱ्या भरावामुळे संकटात सापडलेल्या तालुक्यातील कोळी बांधवांना, मच्छिमारांना न्याय मिळवून देण्यासाठी मनसेचे नेते तथा पालघर ठाणे जिल्हा अध्यक्ष अविनाश जाधव आणि मनसेचे रायगड जिल्हा अध्यक्ष संदेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली जेएनपीए बंदराच्या अंतर्गत येणाऱ्या चौथ्या पोर्टचे गेट बंद आंदोलन उरण तालुका मनसेच्या वतीने करण्यात आले होते. यावेळी मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी चौथ्या पोर्ट गेटवर धडक देऊन घोषणाबाजी केल्या व गेट बंद करण्याचा निर्णय घेतला.

मनसेच्या या गेट बंद आंदोलनामुळे जेएनपीए बंदर परिसरात तीन तास वाहतूक कोंडीची समस्या निर्माण झाली होती.

न्हावाशेवा पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मधुकर भटे यांनी मोठा पोलिस ताफा तैनात करून उपस्थित आंदोलन कर्त्यांना रोखून धरले होते. मनसेचे नेते तथा पालघर– ठाण्याचे जिल्हाध्यक्ष अविनाश जाधव यांच्या हस्ते उरण तालुका मनसेच्या वतीने चौथ्या पोर्टचे व्यवस्थापन अधिकारी यांना आपल्या मागण्यांचे निवेदन देण्यात आले.यावेळी मनसेचे रायगड जिल्हाध्यक्ष संदेश ठाकूर, नाविक सेनेचे सरचिटणीस शेखर जाधव , अमोल तांबे, मनसेचे उरण तालुका अध्यक्ष सत्यवान भगत आदी कार्यकर्ते उपस्थित होते.



## शिवरायांची जगदंबा तलवार महाराष्ट्रात आणणार ; सरकारची घोषणा

**दै.रायगड नगरी । मुंबई**

शिवप्रताप दिनानिमित्त महाराष्ट्र सरकारचे कॅबिनेट मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी मोठी घो–षणा केली आहे. त्यामुळे शिवप्रेमींमध्ये आनंदाचं वातावरण पसरणार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांची जगदंबा तलवार पुन्हा महाराष्ट्रात आणण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. २०२४ पर्यंत जगदंबा तलवार राज्यात आणली जाईल अशी माहिती सुधीर मुनगंटीवार यांनी दिली आहे.

अफजल खानाच्या कबरीजवळील अनधिकृत बांधकाम हटवल्यानंतर राज्य सरकारनं आणखी एक आनंदाची बातमी शिवप्रेमींना दिली आहे. १८७५ च्या आसपास छत्रपतींची जगदंबा तलवार ब्रिटनला नेण्यात आली होती. ही तल–वार पुन्हा मिळावी यासाठी केंद्र सरकारकडून पाठपुरावा करण्यात येत आहे. २०२४ पर्यंत ही तलवार पुन्हा राज्यात येईल अशी अपेक्षा आहे. ही तलवार सध्या इग्लंडच्या ताब्यात आहे. ऋषी सुनक इग्लंडचे पंतप्रधान झाल्यानंतर आता ही तलवार महाराष्ट्रात आणण्यासाठी राज्य सरकार पाऊल टाकत आहे. राज्य सरकारच्या या प्रयत्नांना यश आल्यानंतर महाराष्ट्राची गौरवशाली इतिहासाची साक्षीदार ही जगदंबा तलवार लोकांना पाहता येणार आहे.

करवीर छत्रपतींकडे शिवाजी महाराजांनी वापरलेली तलवार होती. तिचं नाव जगदंबा तलवार होतं. ही तलवार सन १८७५ मध्ये करवीर छत्रपती चौथे महाराज यांनी भारत दौऱ्यावर आलेल्या प्रिन्सला जबरदस्तीची भेट म्हणून देण्यात आली. ही तलवार शिवाजी महाराजांनी वापरली होती असं ब्रिटीश दस्ता–वेजात आहे. कोल्हापूरात जे दस्तावेज आहेत त्यात या शिलेखानात नोंद आहे. ही तलवार



पुन्हा आणावी यासाठी १९०० दशकात अनेक प्रयत्न सुरू होते. महाराष्ट्र शासनाने ही तलवार परत आणण्यासाठी प्रयत्न करत असतील तर आमच्यासारख्या अभ्यासकांसाठी ही आनंदाची बाब आहे असं इतिहास अभ्यासक इंद्रजित सावंत यांनी सांगितले. छत्रपती शिवाजी महाराज यांनी वापरलेली जगदंबा ही तलवार सध्या इंग्लंड येथील राणीच्या वैयक्तिक संग्रहालयात रॉयल कलेक्शन ट्रस्ट येथे ठेवण्यात आली आहे.

जुनी युरोपिअन एकपाती, सरळ तलवार, ज्याच्या दोन्ही बाजूला दोन खोबणी असून, एकामध्ये आयएचएस असे तीन वेळा कोरले आहे. तलवारीच्या मुठीजवळील गजावरती सोन्यामध्ये फुलांची नक्षी कोरली आहे. तल-वारीची मूठ लोखंडी असून, त्याला गोलाकार परज असून, शेवटचे टोक अणकुचीदार आहे आणि त्यावर भरीव सोन्याने कोरलेली फुलांची नक्षी असून, त्यामध्ये मोठे हिरे व माणिक जडवलेले आहेत.

## देशातील पहिलं दिव्यांग मंत्रालय होणार, कॅबिनेट बैठकीत निर्णय

**दै.रायगड नगरी । मुंबई**

रुग्णसेवा आणि दिव्यांग बांधवांच्या न्याय हक्कासाठी लढणारा नेता म्हणून आमदार बच्चू कडू यांची राज्यभर ओळख आहे. मात्र, शिंदे गटासोबत गेल्यानंतर बच्चू कडू यांच्यावर टीकेची झोड उठली होती. त्यावरुनही कडू यांनी नाराजी व्यक्त केली. तसेच, मी काम करणारा कार्यकर्ता आहे, मी माझ्या मतदारसंघातील कामासाठी प्रयत्न करणारा आहे, असे म्हणत मंत्रीपदा–पेक्षा मला लोकांसाठी होणारी काम महत्त्वाची असल्याचंही कडू यांनी म्हटलं होतं. आता, आमदार बच्चू कडू यांची आजपर्यंतची सर्वात मोठी मागणी मान्य झाली आहे. गेल्या २० ते २५ वर्षांपासून कडू यांच्याकडून सुरू असलेल्या प्रयत्नाला मोठं यश आलं आहे.

दिव्यांग कल्याण विभागासाठी स्वतंत्र मंत्रालय स्थापन करावे अशी मागणी आमदार बच्चू कडू (चङ– इरलर्ही घरर्वी) यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली होती. दिव्यांगांच्या प्रश्नांकडे विशेष लक्ष दिले जात नाही यामुळे त्यांच्या समस्या वर्षानु वर्षे प्रलंबित राहतात. त्यांना योग्य प्रकारे न्याय मिळत नाही. दिव्यांग घटकातील कुणीही दुर्लक्षित राहू नये. त्यांच्या समस्या लवकरात लवकर मार्गी लागाव्यात यासाठी स्वतंत्र मंडळ सुरु करणे गरजेचे असल्याचे कडू यांनी मागणीपत्रात म्हटले होते. त्यानुसार, आता कडू यांच्या पाठपुराव्याला यश आले आहे. दिव्यांग मंत्रालय स्थापन करण्याचा निर्णय आज झाला. २० ते २५ वर्षापासून ज्याची प्रतीक्षा होती तो निर्णय आज झाला. मंत्रिमंडळ बैठकीत यावर निर्णय झाला, असे बच्चू कडू यांनी म्हटले.

## मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग मिसींग लिंक डिसेंबर २०२३ पर्यंत पूर्ण होणार

**दै.रायगड नगरी । मुंबई**

जगातील अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून बांधण्यात येणारा मुंबई–पुणे द्रुतगती मार्गाअंतर्गत मिसिंग लिंक प्रकल्प हा देशात पथदर्शी प्रकल्प होणार असून लाखो प्रवाशांना फायदेशीर ठरेल असं प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केले. डिसेंबर २०२३ हा प्रकल्प पूर्णत्वास येईल असंही त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री शिंदे यांनी मुंबई पुणे द्रुतगती मार्गावरील खोपोली ते कुसगाव या लांबीतील नवीन मार्गिकेच्या (मीसिंग लिंक) प्रकल्पाला भेट देऊन लोणावळा (सिंहगड संस्था) येथे सुरू असलेल्या बोगद्याच्या कामाची पाहणी केली. त्यानंतर माध्यमांशी संवाद साधताना ते बोलत होते. 'मिसिंग लिंक' प्रकल्पात जगातील अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. हे काम अतिशय आव्हानात्मक होते. लोणावळा तलावाच्या तळाखाली जवळपास ५०० ते ६०० फूट अंतरावर हा बोगदा आहे. बोगद्याची लांबी ८ कि.मी. असून जगातील अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून हा बोगदा बांधण्यात येत आहे. बोगद्याची रुंदी २३.७५ मीटर असून देशातीलच नव्हे तर जगातील सर्वाधिक रुंदीचा हा बोगदा आहे. मिसींग लिंक प्रकल्पामुळे मुंबई पुणे अंतर अर्ध्या तासाने कमी होणार आहे. बोगद्यामुळे घाटाचा भाग पूर्णतः टाळला जाऊन अपघातसंख्येत मोठी घट होईल, असा विश्वास शिंदे यांनी व्यक्त केला.

त्याचसोबत या प्रकल्पामुळे प्रवास सुखकर होणार आहे. वाहतूक कोंडी कमी होईल. त्याशिवाय प्रदुषण कमी होणार असून इंधनाची तसेच वेळेची बचत होईल. अत्यंत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर. प्रवाशी, वाहने यांच्या सुरक्षेचा यामध्ये विचार करण्यात आला आहे. दरडी कोसळू नये यासाठी सर्वत्र 'रॉक बोल्ट' करण्यात आले आहे.

काही आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास बाहेर जाण्यासाठी प्रत्येक ३०० मीटरवर एक्झीट मार्ग तयार करण्यात आलेले आहेत. बोगद्याच्या भिंतीला ५ मीटरचे कोटिंग असणार असून त्यावर आगप्रतिबंधक कोटींग करण्यात येणार आहे. अत्याधुनिक हाय प्रेशर वॉटर मिक्स यंत्रणा असून त्यामुळे आग लागल्यास ही यंत्रणा त्वरित कार्यान्वित होऊन आग विझेल, अशीही माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली.



## खारघर शहर नो लीकर झोन घोषित करण्याची मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर शहरात निरसुख पॅलेस या नव्या बार अँड रेस्टॉरंटला उत्पादन शुल्क विभागाने दारूविक्रीचा परवाना दिला आहे. तब्बल १५ वर्षांनंतर शहरात नव्याने बार अँड रेस्टॉरंट सुरू झाल्याने नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात आक्रोश आहे. खारघरची ओळख ही नो लीकर झोन म्हणून आहे. या ओळखीला तडा जात असल्याने शेकापच्या शिष्टमंडळाने माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली पालिका आयुक्त गणेश देशमुख यांची दि. ९ रोजी भेट घेत खारघर शहराला अधिकृतरीत्या 'नो लीकर झोन'चा दर्जा देण्याची मागणी केली

शेतकरी कामगार पक्ष व महाविकास आघाडीच्या वतीने पनवेल महापालिकेच्या २०१७ च्या सर्वसाधारण सभेत खारघर शहर नो लीकर झोन घोषित करण्याचा प्रस्ताव मांडला होता. खारघर शहर ग्रामपंचायत शेतकरी कामगार पक्षाच्या ताब्यात असताना खारघर शहर नो लीकर झोन घोषित करून ठराव प्रारीत करण्यात आला होता. ग्रामपंचायतीचे रुपांतर महापालिकेत होताच खारघर शहरात दारू विक्रीस परवानगी देण्यात येवू लागली.



खारघर शहराची नोंद नो लिकर झोन म्हणून कित्येक वर्षापासून आहे. खारघर शहराला शैक्षणिक वारसा लाभलेला आहे. शहरामध्ये कित्येक मोठ–मोठे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालये अस्तित्वात आहेत. खारघर शहरात एका नव्या बार अंड रेस्टॉरंटला उत्पादन शुल्क विभागाने परवानगी दिल्याने नो लिकर झोन म्हणून ओळख निर्माण झालेल्या शहराच्या प्रतिमेला तडा निर्माण झाला आहे.

खारघर शहरामधून मोठ्या प्रमाणात नागरिकांचा विरोध आणि संताप निर्माण होत आहे. खारघर शहर नो लीकर झोन म्हणून न घोषित केल्यास शेतकरी कामगार पक्षाकडून मोठे जनआंदोलन छेडण्यात येईल. असे पालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांनी सांगितले आहे. याबाबतचे निवेदन आयुक्त याना देण्यात आले. यावेळी प्रीतम म्हात्रे यांच्या सोबत शेकाप जिल्हा चिटणीस गणेश कडू, माजी नगरसेविका डॉ. सुरेखा मोहोकर, माजी नगरसेवक डी. पी. म्हात्रे, शेकाप सह जिल्हा चिटणीस प्रभाकर कांबळे उपस्थित होते.

## गोवंशाची चोरी करून त्यांचा छळ करणाऱ्या दोन आरोपी म्हसळा पोलिसांच्या ताब्यात

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

शिवसेना भाजप युती सरकारच्या कार्यकाळात महाराष्ट्र राज्य शासनाने राज्यात गोहत्या बंदी घातल्या पासुन म्हसळा तालुक्यातील गवागावातील शेतकऱ्यांची गुरे चोरीला गेल्याची घटनेत वाढ झाली होती. गोवांश चोरी करून त्यांची हत्या करण्यात येत असल्याच्या अनेक तक्रारी म्हसळा पोलिस ठाणेत नोंद करण्यात आलेल्या आहेत.

या घटनांत म्हसळा पोलिस ठाण्याचे प्र.पोलिस निरीक्षक संदीपान सोनवणे यांच्या पाठपुराव्याला यश प्राप्त झाले आसुन अशाच प्रकारच्या घटनांत अलिबाग येथे अटक करण्यात आलेल्या दोन आरोपींना म्हसळा पोलीसांनी ताब्यात घेतले असून त्यांनी गुन्हा केल्याची कबुली दिली असल्याची माहिती प्र. पोलिस निरीक्षक संदीपान सोनवणे यांनी दिली आहे. अधिक माहिती देताना म्हसळा पोलीस स्टेशन गु.रजि. नं.११३/२२,भादवी कलम ३७९, ४२९, सह प्राणी संरक्षण अधिनियम १९७६ चे कलम ५(ल), (ज्ञ)९(र), प्राण्यांचा छळ प्रतिबंध अधिनियम १९६० चे कलम ११(१)(ङ) या गुन्हयातील आरोपी अय्याज खान रमजान खान, वय ५६ वर्षे, सलमान सलीम शेख, वय ३२ वर्षे रा.कुरेशीनगर, कुर्ला,मुंबई यांना म्हसळा पोलीसांनी अलिबाग येथून ताब्यात घेऊन चौकशी केली असता आरोपींनी गून्ह्याची कबुली दिल्याने त्यांना अटक केली असून पुढील तपास पी.एस.आय.सुर्यवंशी करत आहेत. गोवंश चोरी प्रकरणी अटक आरोपींवर कठोरात कठोर कारवाई करण्याची मागणी म्हसळा तालुक्यातील नागरिकांनी केली असून या प्रकरणात म्हसळा पोलीसांनी कार्यत्तत्परता दाखवली असल्याने त्यांचे कामाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## रायगड जिल्ह्यातील सर्व न्यायालयात भारतभर जागरूकता व संपर्क अभियानाचे आयोजन

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, सर्वोच्च न्यायालय, दिल्ली यांच्याकडील निर्देशाप्रमाणे भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवी वर्षानिमित्त दि.३१ ऑक्टोबर ते दि.१३ नोव्हेंबर २०२२ पर्यंत संपूर्ण भारतात भारतभर जागरूकता व संपर्क अभियानचे आयोजन करण्यात आले आहे. त्याच कार्यक्रमाचा एक भाग म्हणून जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड–अलिबाग व रायगड जिल्हाधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१३ नोव्हेंबर २०२२ रोजी सकाळी १०:३० वाजता क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, जुने पनवेल येथे विधी सेवा शिबीर व शासकीय सेवा व योजनांचा महामेळावा या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

या शिबिरामध्ये रायगड जिल्ह्यातील शासकीय कार्यालयाच्या योजनांची माहिती एकाच छताखाली सर्व लाभार्थ्यांना मिळणार आहे, अशी माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव अमोल शिंदे यांनी दिली आहे. तसेच जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रमुख जिल्हा न्यायाधीश तथा अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड–अलिबाग श्रीमती एस.एस.सावंत यांनी केले आहे.

## कोलाड नाक्यावर रसायन मालवाहतूक करणाऱ्या टँकरचे पाटे तुटले

**दै.रायगड नगरी । गोवे–कोलाड**

मुबंई गोवा या राष्ट्रीय महामार्गावर मुख्य समजल्या जाणाऱ्या कोलाड आंबेवाडी नाका येथील मुख्य चौकात पडलेल्या भल्या मोठया खड्ड्यात रसायन मालवाहतूक करणाऱ्या टँकरचे चाक अडकले आणि त्याचे पाटे तुटल्याने कोलाड आंबेवाडी नाक्यावर एकच खळबळ उडाली व काही काळ मोठी वाहतूक कोंडी निर्माण झाली होती.

या बाबत सविस्तर माहिती अशी की मुबंई गोवा महामार्गावर रसायन माळवाहतूक करणारा टँकर क्रमांक GJ 15 -Y 9697 सदरचा टँकरचा चालक हा बुधवारी ९ नोव्हेंबर रोजी सायंकाळी सात च्या सुमारास त्याच्या रूट प्रमाणे इंदापूर कडून नागोठणेकडे जात असताना कोलाड आंबेवाडी नाक्यावर व मेन चौकात पडलेल्या भल्या मोठ्या खड्यात त्याचा टायर फसला आणि फडाफड त्याचे खालील असलेले मेन पाटे तुटल्याने एकच आवाज झाला आणि काही क्षणातच खळबळ माजली तर दोन्ही बाजूकडील जा ये करणाऱ्या वाहांची मोठी रांग लागून काही काळ या मार्गावर वाहतूक कोंडी निर्माण झाली .

सदरची वाहतूक कोंडी होताच या ठिकाणी कोलाड येथील सौदेव तत्पर असलेली कोलाड येथील पोलीस यंत्रणा या ठिकाणी दाखल होत ही वाहतूक कोंडी केवेल पंधरा ते वीस मिनिटांत नियंत्रित केली. तसेच या मुबंई गोवा महामार्गाच्या चौपदरीकरण कामाच्या भोंगळ कारभाराविरोधात व रखडलेल्या कामाबाबत रायगड प्रेसक्लब च्या वतीने मानवी साखळी आंदोलन छेडण्यात आहे होते मात्र हे दुर्दैव आहे की याच दिवशी संपूर्ण पत्रकारांचे ज्या खड्ड्याकडे लक्ष वेधले होते त्याच खड्डुयाय ही दुर्दैवी घटना घडली परंतु यावेळी कोणतीही विपरीत दुर्दैवी घटना घडली नाही परंतु कोणत्यातरी रसायनाने भरून चाललेला टँकरचे पाटे तुटले परंतु दैव बलवत्तर सदरचा टँकर पलटी झाला नसल्याने मोठा अनर्थ टळला असल्याचे सर्वत्र बोलले जात आहे.

सिडको
शहरांचे शिल्पकार

## CITY AND INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.

# NOTIFICATION

**UNDER SECTION 68(2) OF THE MAHARASHTRA REGIONAL & TOWN PLANNING ACT, 1966**
**TOWN PLANNING SCHEME NO. 7**

**No. CIDCO/NAINA/TPS-7/Draft Scheme/2022/**
**21st Oct.2022**

WHEREAS, the Government of Maharashtra in exercise of powers conferred under clause (b) of Sub-section (1) of the Section 40 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "the said Act") declared by Notification, No. TPS -1712/475/CR-98/12/UD-12: dated 10th January, 2013 and subsequent amendment (hereinafter referred to as "the said Notification") City and Industrial Development Corporation of Maharashtra Limited (being a company owned and controlled by the Government of Maharashtra) (hereinafter referred to as "the Corporation") as Special Planning Authority (hereinafter referred to as "the SPA") for Navi Mumbai Airport Influence Notified Area (NAINA) (hereinafter referred to as "said notified area") as specified therein.

And whereas, the Government of Maharashtra vide Notification No. TPS-1215/245/CR-332/2015/SM/UD-12, dated 27th April, 2017 has sanctioned the Interim Development Plan (IDP) for the 23 villages of NAINA, and also vide Notification No. TPS. 1215/245/C.R. 332/16/EP/UD-12, dated 1st March 2019 has sanctioned the Excluded Parts of the IDP under Section 31(1) of the said Act.

And whereas, the Government of Maharashtra vide Notification No. TPS-1717/ MIS-2750/ C.R.91/ 2019/ UD-12, dated 16th September, 2019 has sanctioned the Development Plan (DP) for 151 villages of NAINA u/s 31(1) of the MR & TP Act, 1966.

And whereas , as per sub- Section (1) of Section 60 of the said Act, CIDCO's Board vide Resolution No 12255, dated 13th September, 2019, had declared its intention for making of Town Planning Scheme No. 7 (TPS- 7) at part of Villages Devad, Vichumbe, Usarli Khurd, Kolkhe and Shivkar of Taluka - Panvel, District - Raigad

And whereas, a notice about declaration of making TPS-7 as per provision in Section 60(2) of the Act, has been published in the Extraordinary official Maharashtra Government Gazette (part-II) dated 18th September, 2019 as well as in the daily newspapers "Ram Prahar" and "Krushiwal" dated 20th September, 2019 in both English and Marathi language.

And whereas, as per Section 61 (1) of the said Act, the Planning Authority shall, in consultation with the Director of Town Planning, make a draft scheme for the area in respect of which the declaration was made, and publish a notice in the Official Gazette within nine months or within the extended period from the date of the declaration.

And whereas, the Joint Director of Town Planning, Konkan division vide Order No. TPS No. 7/NAINA/Section 61(3)/Time-Limit Extension/JDTP-KDN/2061 dated 04th March, 2020 has granted extension of three months' time i.e. up to 19th June, 2020 for making and publication of the said draft scheme.

And whereas, after conducting owners meet on 10th to 20th June, 2020, as per rule No. 4(1) of TPS Rules 1974 by calling all the land owners for discussion and after incorporating suggestions received from the owners, consultation was sought vide submission dated 11th August, 2020 from the Director of Town Planning, GoM, as per section 61 (1) of the said Act and as per rule No. 4 (2) of TPS Rules 1974.

And whereas, in accordance with the amended provisions of section 148(A) of the said Act, vide the Maharashtra Regional and Town Planning (Amendment) Act, 2020 (Maharashtra Act No. XIX of 2020), in computing the period in relation to any Development Plan, Regional Plan or Scheme under the provisions of Chapter II, III, IV and V of the said Act, the period of periods during which any action could not be completed under the said chapters due to enforcement of any Guidelines or lockdown measures by the Government of India or the State Government, as the case may be, to prevent the spread of any pandemic or epidemic or disaster situation arising in the country of State shall be excluded;

And whereas, such prescribed time limit is still in existing on excluding the period of lockdown declared due to spread of covid-19 virus in the State of Maharashtra, by the Government from 23rd March 2020.

And whereas, the Director of Town Planning vide letter जा. क्र. नैना नरयो क्र. 7/ प्र .क्र. 74 / 20 / टीपीव्ही-3 / 1495 dated 15.03.2021 had offered consultation on TPS-7 and also accorded approval for suitable amendment in the sanctioned IDP reservation while making provisions in a draft TPS-7 as per provisions of section 59(2) of the said Act.

And whereas, necessary changes suggested by Director of Town Planning in the consultation have been incorporated in the draft TPS-7.

And whereas, in accordance with provisions of section 61(1) of the said Act, a Notice of making draft TPS-7 had been published in extraordinary official Maharashtra Government Gazette (part-II) dated 25 April 2022 and in local newspapers for inviting suggestions/objections within one month of notice in accordance with the provisions of section 67 of the said Act.

And whereas, the Government of Maharashtra in exercise of powers conferred by sub-section (1) of section 151 of the Said Act, vide Notification No TPS-1817/973/CR-103/17/UD-13 dated 13th September 2017 had delegated the powers exercisable by it under section 68(2) of the said Act to Managing Director, CIDCO (hereinafter will be referred to as "VC&MD")

And whereas, after incorporating necessary changes as per suggestions received, the draft scheme has been submitted to VC&MD for sanction in accordance with section 68(1) of the Said Act on 22nd July 2022.

And whereas, the Government of Maharashtra vide Notification No. टिपीएस – १२१९ / २३८२ / प्र.क्र.१८६ / १९ / नवि-१२ दिनांक ३०/१२/२०१९ has sanctioned the suspension of certain regulations of Development Control and Promotion Regulations of Interim Development Plan of NAINA corresponding to proposed special DCR of TPS-7 in accordance with section 59(1)(b)(iii) of the Act for the proper carrying out of the scheme.

And whereas, in accordance with sub-section (2) of section 68 of the Said Act, VC&MD had sought consultation of Director of Town Planning, Maharashtra State on 08.08.2022 prior to sanction of Draft Scheme.

And whereas, the Director of Town Planning vide letter No. जा. क्र. प्रा.न.र.यो / नरयो क्र.7/ नैना / कलम 68(1) /467 dated 17.10.2022 had given consultation for sanction of Draft TPS - 7 and also accorded approval for suitable amendment in the sanctioned IDP/DP reservation as per provisions of section 59(2) of the said Act.

Therefore, now in accordance with the powers delegated to me by the State Government vide Notification dated 13th September 2017, the Draft Town Planning Scheme No. 7 (TPS-7) at part of Villages Devad, Vichumbe, Usarli Khurd, Kolkhe and Shivkar in one contiguous pocket of Taluka-Panvel, District-Raigad is hereby sanctioned under section 68(2) of the MR&TP Act, 1966 along with corresponding Special Development Control Regulations.

Copy of sanctioned draft TPS-7 along with corresponding special DCRs are made available for inspection by the public during office hours on all working days in the office NAINA, 8th floor, Tower No 10, Belapur Railway Station Complex, CBD Belapur, Navi Mumbai 400614 in accordance with sub-section (3) of section 68 of the Said Act. The same is also uploaded on website of CIDCO i.e. https://cidco.maharashtra.gov.in//naina and further can be obtained on payment of prescribed fees.

## शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र मर्यादित

# अधिसूचना

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन आणि नगररचना अधिनियम १९६६च्या कलम ६८ च्या उपकलम (२) नुसार**
**नगररचना परीयोजना क्रमांक - ७**

**क्र. सिडको / नैना / न.र.यो. ७/प्रा.यो./२०२२/**
**२१ ऑक्टोबर २०२२**

ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन आणि नगररचना अधिनियम १९६६ (महा.अधिनियम XXXVII, १९६६) (येथून पुढे उक्त अधिनियम असे निर्देशित करण्यात येईल), च्या कलम ४०च्या उपकलम (१) मधील खंड (ब) द्वारा प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभाग (नविवि) ने अधिसूचना क्रमांक टीपीएस-१७१२/४७५/प्र.क्र.-९८/१२/नवि-१२ दिनांक १० जानेवारी, २०१३ व वेळोवेळी झालेल्या सुधारणा अन्वये त्यात नमूद केल्याप्रमाणे, नवी मुंबई विमानतळ प्रभावित अधिसूचित क्षेत्र (नैना), (येथून पुढे उक्त क्षेत्र असे निर्देशित करण्यात येईल) साठी शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित (महाराष्ट्र शासनाच्या मालकीची व नियंत्रणाखालील कंपनी) म्हणजे सिडकोची विशेष नियोजन प्राधिकरण (येथून पुढे वि.नि.प्रा.असे निर्देशित करण्यात येईल) म्हणून नेमणूक केली आहे.

आणि ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाने अधिसूचना क्र. टीपीएस-१२१५/२४५/ सीआर-३३२/२०१५/एस.एम./यूडी -१२, दिनांक २७ एप्रिल, २०१७ नुसार नैनातील २३ गावांसाठी अंतरिम विकास आराखडा मंजूर केला आहे. आणि अधिसूचना क्र. टीपीएस. १२१५/२४५/प्र.क्र.-३३२/१६/ई.पी./नवि-१२ दिनांक १ मार्च, २०१९ अन्वये अधिनियमाच्या कलम ३१ च्या उपकलम (१) नुसार अंतरिम विकास आराखड्याचा वगळलेले भाग मंजूर केले आहेत.

आणि ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाने अधिसूचना क्र. टीपीएस -१७१७/ एमआयएस २७५०/सीआर -९१ /२०१९/यूडी -१२, दिनांक १६ सप्टेंबर, २०१९ नुसार नैनातील १५१ गावांसाठी विकास आराखडा मंजूर केला आहे.

आणि ज्याअर्थी , अधिनियमातील कलम ६० च्या उप-कलम (१) नुसार सिडकोच्या संचालक मंडळाने दिनांक १३ सप्टेंबर, २०१९ रोजीच्या ठराव क्र. १२२५५ अन्वये मौजे देवद (भाग), विचुंबे (भाग), उसर्ली खुर्द (भाग), कोळखे (भाग) आणि शिवकर (भाग), तालुका पनवेल, जिल्हा रायगड येथे नगररचना परीयोजना क्रमांक ७ (टीपीएस - ७) करण्याकरिता त्याचा उद्देश घोषित केला आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ६०(२) मध्ये नमूद तरतूदीनुसार टीपीएस -७ करण्याच्या उद्देशाची घोषणा दिनांक १८ सप्टेंबर, २०१९ रोजीच्या असाधारण अधिकृत महाराष्ट्र शासकीय राजपत्रात (भाग-२) आणि दिनांक २० सप्टेंबर, २०१९ रोजीच्या स्थानिक वृत्तपत्रे "रामप्रहर" आणि " कृषिवल " यात इंग्लिश व मराठी भाषेत प्रकाशित करण्यात आली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ६१(१) नुसार, नियोजन प्राधिकरणाने संचालक, नगर रचना, यांच्याशी सल्लामसलत करून, ज्या योजनेसाठी घोषणा करण्यात आली त्या क्षेत्रासाठी प्रारूप योजना तयार करुन घोषणेच्या तारखेपासून नऊ महिन्यांच्या आत किंवा वाढीव कालावधीत अधिकृत महाराष्ट्र शासकीय राजपत्रात नोटीस प्रकाशित करावयाची आहे.

आणि ज्याअर्थी, सह संचालक, नगर रचना, कोकण विभाग यांनी आदेश क्रमांक प्रा.न.र.यो.क्र ७/नैना/कलम ६१(३)/मुदतवाढ/सहसंकोवि /२०६१ दिनांक ४ मार्च, २०२० अन्वये प्रारूप योजना बनवून प्रकाशित करण्यासाठी तीन महिन्यांचा म्हणजेच दि. १९ जून, २०२० पर्यंतचा वाढीव कालावधी दिलेला आहे.

आणि ज्याअर्थी, टीपीएस नियम १९७४ च्या नियम क्रमांक ४(१) नुसार दिनांक १० ते २० जून, २०२० रोजी संबंधित जमीन मालकांची सभा आयोजित करून आणि जमीन मालकांकडून मिळालेल्या सूचनांचा समावेश केल्यानंतर दिनांक १९ मार्च, २०२० रोजी च्या प्रस्तावान्वये टीपीएस-७ चा मसुदा उक्त अधिनियमाच्या कलम ६१(१) नुसार आणि टीपीएस नियम १९७४ या नियम क्रमांक ४(२) नुसार संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे सल्लामसलतीसाठी पाठविण्यात आला.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन रचना (सुधारणा) अधिनियम २०२० (सन २०२० चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१९) द्वारे, उक्त अधिनियमाच्या कलम १४८(अ) मधील सुधारित तरतुदीनुसार, अधिनियमातील प्रकरणे दोन, तीन, चार व पाच मधील तरतुदीप्रमाणे, कोणत्याही विकास योजना, प्रादेशिक योजना किंवा योजनांसाठी कालावधी विचारात घेतांना, देशामध्ये किंवा राज्यामध्ये उद्भवणाऱ्या कोणत्याही महामारीच्या किंवा साथीच्या रोजच्या फैलावास किंवा आपत्तीजन्य परिस्थितीस प्रतिबंध करण्याकरिता, भारत सरकारने किंवा, यथास्थिती, राज्य शासनाने केलेल्या कोणत्याही मार्गदर्शक तत्वांच्या किंवा टाळेबंदी उपाययोजनांच्या अंमलबजावणीमुळे, उक्त प्रकरणानुसारची कोणतीही कार्यवाही पूर्ण होऊ शकली नसेल तर, असा कालावधी वगळणे आवश्यक आहे

आणि ज्याअर्थी, उक्त प्रारूप नगर रचना परियोजना क्र. ७ मंजुरीचा विहित कालावधी, महाराष्ट्र राज्यात दिनांक २३ मार्च,२०२० पासून कोविड-१९ विषाणूच्या प्रादुर्भावामुळे जाहीर केलेला टाळेबंदीचा कालावधी वगळता अजून अस्तित्वात आहे

आणि ज्याअर्थी, संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक १५ मार्च, २०२१ रोजीच्या पत्र क्र. जा. क्र. नैना/नरयो क्र.७/ प्र. क्र.७१/ २०/टीपीव्ही-३/१४९५ अन्वये टीपीएस -७ बाबत सल्लामसलत दिली आहे तसेच टीपीएस -७ बनवताना मंजूर विकास योजनेच्या प्रस्तावांमध्ये झालेल्या बदलांना उक्त अधिनियमाच्या कलम ५९(२) अन्वये मंजुरी दिलेली आहे.

आणि ज्याअर्थी, संचालक, नगर रचना यांनी सल्लामसलतीत सुचविल्याप्रमाणे आवश्यक ते बदल टीपीएस-७ मध्ये करण्यात आलेले आहेत आणि सल्लामसलतीनुसार आवश्यक ते बदल करून उक्तअधिनियमाच्या कलम ६१(१) अन्वये प्रारूप टीपीएस-७ तयार करण्यासंबंधीची नोटीस दिनांक २५.०४.२०२२ रोजीच्या असाधारण अधिकृत महाराष्ट्र शासकीय राजपत्रात (भाग -२) आणि स्थानिक वृत्तपत्रे यात उक्त अधिनियमाच्या कलम ६७ च्या तरतुदींनुसार नोटीसच्या एक महिन्याच्या आत सूचना/आक्षेप मागविण्यासाठी प्रकाशित करण्यात आली आहे.

आणि ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाने उक्त अधिनियमाच्या कलम १५१ च्या उप-कलम (१) नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून दिनांक १३ सप्टेंबर, २०१७ रोजीच्या अधिसूचना क्रमांक टीपीएस-१८१७/९७३/सीआर-१०३/१७/यूडी-१३ अन्वये त्यांच्यातर्फे कलम ६८(२) अंतर्गत वापरण्यात येणारे अधिकार सिडकोचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, यांना प्रदान केलेले आहेत.

आणि ज्याअर्थी, प्राप्त झालेल्या सूचनांप्रमाणे आवश्यक बदल समाविष्ट केल्यानंतर, प्रारूप योजना उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांना उक्त अधिनियमाच्या कलम ६८(१) नुसार दि. २२.०७.२०२२ रोजी मंजुरीसाठी सादर करण्यात आली.

आणि ज्याअर्थी, परीयोजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी उक्त अधिनियमाच्या कलम ५९(१)(ख)(iii) अन्वये महाराष्ट्र शासनाने अधिसूचना क्र. टिपीएस-१२१९/२३८२/ प्र.क्र.१८६/१९/ नवि-१२ दिनांक ३०/१२/२०१९ अन्वये मंजूर अंतरिम विकास योजनेच्या विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीच्या काही तरतुदींच्या तहकुबीला मंजुरी दिलेली आहे.

आणि ज्याअर्थी उपा व व्य सं. यांनी दि. ०८ ऑगस्ट, २०२२ रोजी उक्त अधिनियमाच्या कलम ६८च्या उप-कलम (२) नुसार, प्रारूप योजना मंजूर करण्यापूर्वी संचालक, नगर रचना महाराष्ट्र राज्य यांची सल्लामसलत मागितली आहे.

आणि ज्याअर्थी संचालक, नगर रचना महाराष्ट्र राज्य यांनी दि. १७ ऑक्टोबर, २०२२ रोजीचे पत्र. जा. क्र. प्रा.न.र.यो / नरयो क्र.७/ नैना / कलम ६८(१) /४६७ अन्वये प्रारूप योजनेच्या मंजुरीसाठी सल्ला दिला आहे तसेच मंजूर विकास योजनेच्या प्रस्तावांमध्ये झालेल्या बदलांना उक्त अधिनियमाच्या कलम ५९(२) अन्वये मंजुरी दिलेली आहे.

म्हणून, आता या अधिसूचनेद्वारे, दि. १३ सप्टेंबर, २०१७ च्या अधिसूचनेअन्वये राज्य सरकारद्वारे मला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून पनवेल तालुक्यातील रायगड जिल्ह्यातील मौजे देवद (भाग), विचुंबे (भाग), उसर्ली खुर्द (भाग), कोळखे (भाग) आणि शिवकर (भाग), येथे एकसंलग्न अशा **प्रारूप नगररचना परीयोजना क्रमांक ७ (टीपीएस -७)** त्यासोबतच्या विशेष विकास नियंत्रण नियमावलीसह उक्त अधिनियमाच्या कलम ६८ च्या पोटकलम (२) अन्वये मंजूर करण्यात येत आहे.

उक्त अधिनियमाच्या कलम ६८ च्या उपकलम (३) नुसार मंजूर प्रारूप टीपीएस -७ योजनेची प्रत संबंधित विशेष नियंत्रण नियमावलीसह नैना कार्यालय, ८ वा मजला, टॉवर नं. १०, बेलापूर रेल्वे स्टेशन संकुल, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ येथे कार्यालयीन कामकाजाच्या सर्व दिवशी नागरीकांच्या अवलोकनार्थ खुली ठेवण्यात आली आहे. तसेच प्रारूप टीपीएस-७ सिडकोचे संकेतस्थळ https://cidco.maharashtra.gov.in//naina येथे सुद्धा अपलोड केली गेली आहे आणि विहित शुल्क भरल्यानंतर देखील मिळू शकते.

## Special Development Control Regulations for Draft TPS-7

In addition to the Development Control and Promotion Regulations, which are made applicable to the 23 Revenue villages of NAINA vide directives given by Government vide no. TPS-1717/2750/C.R.91/19/UD-12, dated 6/1/2020 (hereinafter called as 'Sanctioned NAINA DCPR') under section 37(1AA) read with section 154 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966, the following special Regulations shall be applicable to the development of any sort to be carried out in the final plots of the Town Planning Scheme No.-7, NAINA. Rest of the provisions of prevailing sanctioned DCPRs of NAINA as amended from time to time shall be applicable. In case of any conflict between the regulations in sanctioned NAINA DCPRs and these special regulations prescribed below arises, then these special regulations shall prevail.

1. The Final Plots allotted to the owners in lieu of their Original Plots shall be considered as included in the Predominantly Residential zone of the sanctioned Interim Development Plan and shall be eligible for development for uses prescribed in Regulation No. 31 of the sanctioned DCPRs of NAINA.

   Provided that the final plots fronting on roads having width of 12.0m or more shall be permissible for development either under regulation of Predominantly Residential zone or under Mixed use zone of sanctioned DCPR irrespective of the actual zonal boundaries of the IDP.
2. Boundaries of the Final Plots shall not be changed, modified or altered during development.
3. Amalgamation of two or more Final plots shall not be permitted to form a new Final Plot. However, integrated development in two or more adjoining Final Plots shall be permitted considering sum of their areas as one unit for development.
4. Temporary / short term development proposals on any ground shall not be permitted within the portions of original plots which are merged during the reconstitution to form a Final Plots not allotted to the holders / owners of such original plots.
5. Development Permission in a Final Plot shall be granted only after ascertaining that the amount mentioned in column 15 of Form No. 1 of the Final Scheme under Rule No. 6(v) of the Maharashtra Town Planning Schemes Rules, 1974 is fully recovered. However, the Special Planning Authority, NAINA (CIDCO) may allow such amount to be recovered in suitable installments within a period up to the issuance of Occupancy Certificate. This amount is in addition to the Development Charges prescribed under chapter VI-A of the Maharashtra Regional and Town planning Act, 1966.
6. Internal Sub-division / partition of a Final Plot shall be permissible subject to strictly adhering to the boundaries of respective Final Plot and subject to provisions of sanctioned DCPRs of NAINA.
7. The 10% Recreational Open Space prescribed under regulation No. 20.3.1 of the sanctioned DCPRs of NAINA shall not be enforced in developing Final Plot admeasuring 0.40 ha or more considering that such open spaces are provided in the form of playground and open spaces in the scheme in addition to those reserved in the Development Plan for which owners of the original plots have shared their lands.
8. The 5% Amenity Space prescribed under regulation No. 20.3.11 of the sanctioned DCPRs of NAINA shall not be enforced in developing Final Plot admeasuring 2.00 ha or more considering that such Amenity spaces are provided separately in the scheme in addition to those reserved in the Development Plan for which owners of the original plots have shared their lands.
9. The provision of 20% plots/tenements for EWS / LIG as inclusive housing prescribed under Regulation No. 20.6 of the DCPRs of NAINA read with Annexure- 4 shall not be made applicable for a sub-division or layout of a Final Plot as the Scheme provides dedicated plots for EWS / LIG housing for which the owners of final plots have shared the lands from their original plot.

Notes:

i. The regulations at serial number 7, 8 and 9 above shall not be applicable for Final Plots having area more than 50% of the original plots. For such plots the provisions of sanctioned DCPRs of NAINA in force shall be applicable.

ii. In cases wherein CC is already granted (before declaration of TPS), if the final plot is given by reducing land area under Recreational Open Space (RG), Amenity and layout road, then while processing Amended CC or OC of such final plots, land area as per CC for Open Space, Amenity shall not be insisted upon. However, location and land area of remaining Open Space and Amenity inside the final plot shall be maintained as per CC.

10. The owners of Final Plots are entitled for monetary compensation as recorded in form No. 1 of the Final Scheme as per Rule 6(v) of the Maharashtra Town Planning Schemes Rules, 1974. However, the owners may opt for FSI or TDR in lieu monetary compensation as provided under section 100 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966. Such Compensation partially in terms of FSI / TDR and partially in amount shall not be permissible.
11. The Base FSI applicable to the lands included under the Town Planning Scheme shall be 1.00. However, if the owners of Final plots opt compensation in the form of FSI as provided under section 100 of the Act, then the FSI permissible in a final plot shall be computed as below:

$$\text{FSI of Final Plot} = \frac{\text{Area of Original Plot}}{\text{Area of Final Plot}}$$

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

# रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलने पटकाविले देशात अव्वल स्थान; १९ नोव्हेंबरला दिल्लीत होणार भारत सरकारच्यावतीने सन्मान

**दै.रायगड नगरी । पनवेल**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेल्या जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलने देशातील सर्वात स्वच्छ विद्यालयाचा होण्याचा मान पटकावत विशेष प्राविण्यासह देशात अव्वल स्थान मिळविले आहे. भारत सरकारच्यावतीने 'स्वच्छ विद्यालय राष्ट्रीय पुरस्कार' चा बहुमान मिळवणारे रायगड, नवी मुंबईतील हे एकमेव विद्यालय ठरले असून रायगड जिल्ह्याचा गौरव वृंध्दीगत करणारी अभिमानास्पद कामगिरी आहे.

भारत सरकारच्या वतीने स्वच्छ विद्यालय पुरस्कार २०२१-२२ साठी शाळांचे नामांकन मागविण्यात आले होते. त्यामध्ये महाराष्ट्रातून १ लाख ०३ हजार शाळांनी पुरस्कारासाठी नामांकन केले होते.



त्या मधून जिल्हा व राज्य पातळीवर सर्वेक्षण करून माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावर रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल खारघर या शाळेला राज्यस्तरीय प्रथम क्रमांकाने सन्मानित करण्यात आले होते.

त्यानंतर राष्ट्रीय पुरस्कारासाठी राष्ट्रीय स्तरावर एकूण ६०६ शाळांची निवड करण्यात आली. त्यामध्ये महाराष्ट्रातून माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावर रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, खारघर या शाळेला भारत सरकार व युनिसेफ यांच्यातर्फे राष्ट्रीय स्वच्छ विद्यालय पुरस्कार २०२१ - २२ जाहीर करण्यात आला आहे. आणि हा पुरस्कार १९ नोव्हेंबर २०२२ रोजी दिल्ली येथे होणाऱ्या समारंभात केंद्रीय शिक्षण मंत्री यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे.

तत्पूर्वी आज (गुरुवार, दि. १० नोव्हेंबर) रायगड जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या हस्ते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कुलच्या मुख्याध्यापिका राज अलोनी, हेड बॉय मास्टर आदेश परेश ठाकूर आणि शाळेच्या कोऑर्डिनेटरर्स यांचा सन्मान करण्यात आला, तसेच जिल्हयातील विद्यालयाला हा राष्ट्रीय पुरस्कार मिळत आहे तो रायगड जिल्ह्यासाठी खुप अभिमानाची बाब आहे, असेही डॉ. पाटील यांनी नमूद करून पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या. या यशाबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था, विद्यालयाच्या प्राचार्या, शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# अडीच वर्षाच्या प्रतीक्षेनंतर अखेर वन खात्याने श्रीवर्धन समुद्रकिनारी सुरुची लागवड केली

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

३ जून २०२० रोजी संपूर्ण जगामध्ये कोरोना महामारीचे थैमान सुरू असताना अरबी समुद्रात तयार झालेले निसर्ग चक्रीवादळ श्रीवर्धन व हरिहरेश्वर समुद्रकिनाऱ्यावरती धडकले. या दोन्ही परिसरामध्ये अक्षरशः हा:हा:कार माजला. ८० टक्के नागरिकांच्या घरावरील छपरे उडून गेली होती, तर ज्या इमारती अस्तित्वात होत्या त्यांच्या शेवटच्या स्लॅबवरील पत्र्याच्या शेड देखील पूर्णपणे उडून गेल्या होत्या.

श्रीवर्धन शहरातील वीज पुरवठा सुरळीत होण्यासाठी तब्बल एक महिन्याचा कालावधी लागला होता. तर हरिहरेश्वर परिसरात साडेतीन महिन्यानंतर वीज पुरवठा सुरळीत करण्यात महावितरणला यश आले होते. या सर्व नुकसानी बरोबरच श्रीवर्धन व हरिहरेश्वर येथील नारळ सुपारी बागायतदारांचे अतोनात नुकसान झाले. नारळ सुपारीच्या वाडी मध्ये अस-लेली असंख्य नारळाची, सुपारीची झाडे अर्ध्यावरून मोडून पडली किंवा जमीन दोस्त झाली. त्याचबरोबर वाडीमध्ये पूरक पीक म्हणून घेण्यात येणारे कोकम, फणस, आंबा इत्यादी फळझाडे देखील जवळजवळ नष्ट झाली.

काही वर्षांपूर्वी श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावरती केवड्याची मोठ मोठी बने होती. या केवड्याच्या बना मुळे कितीही जोरात वारा आला तरी तो अडला जात असे व त्या वाऱ्या पासून गावाचे संरक्षण होत असे. २००१ साली देखील वनखात्याने केवड्याची बने नष्ट झाल्यामुळे श्रीवर्धन समुद्रकिनारी जवळजवळ दहा हजार सुरूच्या झाडांची लागवड केली होती. परंतु निसर्ग चक्रीवादळाच्या धडाक्यामुळे यातील ७० ते ८०% सुरुची झाडे उन्मळून पडली तर काही अर्ध्यावरून मोडली.

मात्र श्रीवर्धन समुद्रकिनारी पुन्हा सुरुची लागवड करण्यासाठी वनखात्याला अडीच वर्षांचा कालावधी लागलेला आहे. आता लावलेली सुरुची झाडे मोठी होण्यासाठी कमीत कमी सात ते आठ वर्षांचा कालावधी लागणार आहे. त्यानंतर सुरूच्या झाडांचा प्रत्यक्षात वारा आडण्यासाठी उपयोग होणार आहे. मात्र उशिरा का होईना वनविभागाने सुरुची झाडे लावल्याने नागरिकांमधून वनविभागाला धन्यवाद देण्यात येत आहेत.




सिडको
शहरांचे शिल्पकार

Provided that such FSI computed as above shall be permissible to those who have opted to avail the compensation in terms of FSI instead of monetary compensation worked out in Form No. 1 of the Final Scheme.

Provided further that, the lands eligible of 1.00 FSI as per sanctioned DCPRs of NAINA (i.e within 200 m of Gaothan), if included in TPS shall be permitted 25% additional incentive FSI in lieu of their 60% land contribution to the project. The FSI of the final plot (whether anchored at its original location or otherwise) against such land parcels shall be increased in proportion to its area, irrespective of whether the final plot is a standalone plot or amalgamated with other land parcels.

12. The permissible FSI in respect of Final Plots, whose owners have been awarded monetary compensation as per Form No. 1 of the Final Scheme prescribed under Rule No. 6(v) of the Maharashtra Town Planning Schemes Rules, 1974 shall be 1.00
13. If the FSI permissible on a final plot becomes remain unconsumed due to maintain prescribed marginal distances / height restriction/ firefighting requirements or any such statutory restrictions, in such cases the balance FSI over and above FSI consumed may be permitted to be transferred as TDR to any Plot situated in any Town Planning Schemes and phase-I area of NAINA Development Plan subject to;
    i. The provision of Regulations no. 43 of the sanctioned DCPR of NAINA shall be applicable.
    ii. Such transfer of development right from a final plot to another Final Plot shall be permitted once only.
    iii. The aggregate FSI in a receiving Final Plot shall not exceed 4.00
    iv. The owner transferring the FSI shall not develop his Final Plot at any time to consume FSI more than 1.00
    v. The Final Plot after such transfer shall not be eligible for any additional FSI/TDR in future.
    vi. The owner of such Final Plot shall not ask for monetary compensation for balance FSI if any after partially transferring the FSI received in lieu of monetary compensation as TDR.
14. The permissible FSI in respect of Final Plots designated to Amenity Plots or to schools, primary health center shall be 2.5.
15. The permissible FSI in respect of Final Plots designated to Electric Sub-Station, Daily Bazaar, ESR/GSR in the scheme shall be 1.00.
16. The permissible FSI in respect of Final Plots designated to EWS/LIG Housing or Housing of the dispossessed persons or Final Plots reserved as Sale plots in this scheme shall be 4.00.
17. The permissible FSI in respect of Final plots designated to Growth center in this scheme shall be 2.5.
    Provided that the aforesaid FSI may be increases maximum upto 4.0 on payment of FSI linked premium (FLP) for over and above 2.5 FSI as prescribed in the sanctioned DCPR of NAINA for every increase of FSI of 0.30.
18. The Final Plots designated for Open Spaces, Parks or Play-Grounds are permissible to built-up area equal to 15 % of the respective final plot area subject to ground coverage up to 10 % of the respective final plot and structures shall be only of ground or ground plus one floor. Such structure shall be at one corner of respective final plot and shall be used for any use complementary to the designated use
19. Side and Rear Marginal Spaces

| Area of plot | Category of building | Maximum permissible height of the building | Min Marginal Open Spaces (in M.) | |
|---|---|---|---|---|
| | | | Side | rear |
| 40 M2 to less than 150 M2 *Pls refer Special Note | Row houses type | Upto 15 M | 0.0 | 1.5 |
| | Semi-detached type | Upto 15 M | 1.5 | 1.5 |
| *Special Note : Irrespective of the road width on which these plots abuts, the maximum front margin shall be 3.00 M. | | | | |
| 150 M2 to less than 450 M2 | Semi-detached type | Upto 15 M | 1.5 | 2.25 |
| | Detached type | Upto 15 M | 2.25 | 2.25 |
| | | Above 15 MUpto 24.0 M | H/5 | H/5 |
| 450 M2 to the less than 1000 M2 | Detached type | Upto 15 M | 3.00 | 3.00 |
| | | Above 15 MUpto 24.0 M | H/5 | H/5 |
| | | Above 24.0M upto 37.5 M | 6.00 | 6.00 |

| Area of plot | Category of building | Maximum permissible height of the building | Min Marginal Open Spaces (in M.) | |
|---|---|---|---|---|
| | | | Side | rear |
| 1000 M2 and above | Detached type | Upto 15 M | 3.00 | 3.00 |
| | | Above 15 MUpto 24.0 M | H/5 | H/5 |
| | | Above 24.0M Upto 37.5 M | 6.00 | 6.00 |
| | | Above 37.5 M upto 60.0 M | H/5 or 9.00m whichever is less | H/5 or 9.00m whicheve r is less |
| | | Above 60.00 M | 12.00 | 12.00 |
| (Where H = Height of the building above ground level). | | | | |

a) Irrespective of height and length of the buildings, the marginal open spaces more than 12.0 M shall not be insisted upon. Long length factor for buildings above 40meter length shall not be applicable.
b) The provision of dead wall mentioned in sanctioned DCPRs of NAINA shall be applicable.
c) For special building use No projections of any sort shall be permissible in the side and rear marginal open spaces mentioned above.
   Provided that projections required for firefighting and chajja or weather shed upto 0.75 m over openings shall be permitted after clearance from CFO, CIDCO along with the minimum height at which it is to be provided.
d) Provision of front open spaces shall be in accordance with sanctioned DCPRs of NAINA. However, Front open space for residential use and predominantly residential use (in case of mixed use) buildings of height more than 15m upto 24 m shall be 4.5m and for above 24 m building height front open space shall be 6.0 m.
e) The building height for the purposes of light and ventilation regulation and for calculating the marginal distances shall be exclusive of height of parking floors. In case of part parking floor such provision shall be applicable only to the part where parking is provided.

20. Mechanical/Hydraulic/Stack parking/multi-storeyed parking with or without car lift may be allowed to meet the requirement.
21. If the basement is proposed flushing to average surrounding ground level, then such basement can be extended in side and rear margins upto 1.5 m. from the plot boundary and beyond the building lines at ground level subject to a clear minimum front margin of 4.5 m and further subject to non-habitable uses and provision for mechanical ventilation and all safety provisions and drainage. However, it is essential that the basement top slab below the external circulation at ground level should be designed for firefighting vehicular loads as per NBC 2016.
    Provided that the above provision shall be permissible after the clearance from the Chief Fire Officer, CIDCO.
22. Every building or group of buildings together shall be either connected to a Drainage system or be provided with sub-soil dispersion system in the form of septic tank of suitable size and technical specifications, modern methods of disposals, shall be permitted at the discretion of the Authority.
23. The service road of the State highways and National highways shall be considered for the access to the plot.
    Further the plots along the other categorized roads such as Major District roads/ Village roads shall be directly accessible from these roads.
    In both the cases for final plots in Town Planning scheme, Ribbon development rules shall not be applicable.
24. The distance between two main buildings in a final plot shall be that required to be provided for a taller building amongst them subject to 12.0m as maximum.
25. Construction within River and blue line: Construction within River and Blue line may be permitted at a height of 0.60 m. above red flood line level. Provided that necessary mitigation measures are followed along with clearance from Irrigation department.
26. Grant of Development Permission does not constitute acceptance of correctness, confirmation, approval or endorsement of and shall not bind or render the competent authority liable in any way in regard to;
    a. Title Ownership and easement right of the plot on which building is proposed.
    b. Workmanship, soundness of material and structure safety of building.
    c. Variation in area from recorded areas of building unit.
    d. Location and boundary of building unit.
    e. Safety of the user of the building.
    f. NOC from appropriate authority.
    g. Structural reports and Structural drawing

Place :-Navi Mumbai
Date:-21.10.2022

Regd. Office: Nirmal, 2nd floor,
Nariman point, Mumbai-400021.

**Dr. Sanjay Mukherjee**
Vice Chairman& Managing Director,
CIDCO

स्थळ: नवी मुंबई
दिनांक: २१ ऑक्टोबर २०२२

नोंदणीकृत कार्यालय: निर्मल, २ रा मजला,
नरीमन पॉइंट, मुंबई ४०००२१.

**डॉ. संजय मुखर्जी**
उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक,
सिडको

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/३२५/२०२२-२३


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## रिक्षाची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कळंबोली वसाहतीमधून एक रिक्षा चोरीस गेल्याची घटना घडल्याने रिक्षा मालकांमध्ये भीतीयुक्त वातावरण आहे.

कळंबोली वसाहतीमधील दक्षिण मुखी हनुमान मंदिर येथे सुभाष मुदोकर यांनी त्यांची ५० हजार रुपये किमतीची रिक्षा क्रमांक -MH46/BP/1634.ही सदर ठिकाणी उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्यांनी सदर रिक्षा चोरून नेली आहे . तरी या बाबत कोणाला माहिति किंवा सापडल्यास कळंबोली पो ठाणे -०२२-२७४२३००० किंव्हा HC शिवानंद पुजारी ८१६९४७४५२६ यांच्याशी संपर्क करावा.

## दुंदरे ते शिवणसई रस्त्याची दुरावस्था

**दै.रायगड नगरी । पनवेल**

दुंदरे ते शिवणसई या रस्त्याची खूप मोठया प्रमाणात दुरावस्था झालेली आहे. रस्त्यावर जागोजागी खड्डे पडलेले आहेत. त्यामुळे येथे प्रवाश्यांना जीव मुठीत घेवून प्रवास करावा लागत आहे. येथून रात्री अपरात्री प्रवास करणे धोक्याचे झाले आहे. अपघात होण्याचीही शक्यता नाकारता येत नाही.

तरी सदर रस्त्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडून लवकरात लवकर करावे अशी मागणी मनसेचे दिनेश मांडवकर- पनवेल तालुका सचिव, विश्वास पाटील- पनवेल तालुका उपाध्यक्ष, विद्याधर चोरघे, गुरुनाथ भोपी,कुणाल फडके, देवदास भोपी, अमित पालकर यांनी केली आहे.

तसेच नेरे ते मालडुंगे (धोदाणी) या रस्त्याच्या दोन्ही कडेला खूप मोठया प्रमाणात गवत वाढलेले आहे. या वाढलेल्या गवतामुळे वळणावर समोरून आलेले वाहन दिसत नसल्यामुळे अपघाताची मालिका सुरू आहे. मागील पंधरा दिवसात या रस्त्यावर तीन ते चार अपघात झाले आहेत. सुदैवाने यात जीवितहानी झालेली नाही. मात्र होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. तरी रस्त्याच्या कडेला वाढलेल्या गवताची लवकरात लवकर कापणी करण्याची मागणी करण्यात आली आहे.


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# शिवसेना नेते खा.संजय राऊत यांच्या सुटकेनंतर पनवेलमध्ये शिवसैनिकांचा जल्लोष

**दै.रायगड नगरी । पनवेल**



शिवसेना नेते, खासदार संजय राऊत यांच्या सुटके नंतर पनवेलमध्ये शिवसैनिकांनी मध्यवर्ती शाखेजवळ उपस्थित राहून फटाके फोडून मिठाई वाटप करून ढोलताशांच्या गजरात जल्लोष करीत घोषणा दिल्या.

यावेळी तालुका प्रमुख विश्वास पेटकर, उपमहानगर प्रमुख अच्युत मनोरे, पनवेल शहरप्रमुख प्रविण जाधव, महिला आघाडी पनवेल शहर संघटिका अर्चना कुळकर्णी, महिला आघाडी उपशहर संघटिका उज्वला गावडे, मा.नगरसेवक विश्वास म्हात्रे, पनवेल उपशहरप्रमुख शैलेश जगनाडे, उपशहरप्रमुख सनी टेमघरे, शाखाप्रमुख प्र. क्र. १८ राजेश शेट्टीगार, अलंकार महाजन, संकेत बुटाला, शिवसेना ग्राहक कक्ष कुणाल कुरघोडे, विभागप्रमुख प्र. क्र. १८ अमित शेखर माळी, उपविभाग प्रमुख प्रदीप माखीजा, प्र. क्र.१८ शाखाप्रमुख शुभम शेखर माळी, शाखाप्रमुख विजय शिंदे, दत्ता फडके आदींनी मध्यवर्ती शाखेजवळ उपस्थित राहून फटाके फोडून मिठाई वाटप करून ढोलताशांच्या गजरात जल्लोष करीत घोषणा दिल्या.

## संजय राऊत यांच्या सुटकेचा आनंदोत्सव कर्जत शिवालय येथे साजरा




**दै.रायगड नगरी । कर्जत**

रायगड जिल्हाप्रमुख मनोहर भोईर यांच्या उपस्थितीत शिवसेना नेते तथा राज्यसभा खासदार संजय राऊत यांच्या सुटकेचा आनंदोत्सव कर्जत येथील शिवालय येथे साजरा करण्यात आला.

काल दि.९ नोव्हेंबर रोजी कोर्टाने संजय राऊत यांना जामीन मंजूर केला, संध्याकाळी ८ वाजता शिवसेना मध्यवर्ती कार्यालय शिवालय कर्जत येथे जिल्हाप्रमुख मनोहर भोईर, रायगड जिल्हा संघटक सुवर्णा जोशी, कर्जत तालुका प्रमुख उत्तम कोळंबे, कर्जत तालुका संपर्कप्रमुख सुदाम पवाळी, महिला तालुका संघटक करुणा बडेकर, युवासेना कर्जत तालुका सचिव ॲड. संपत हडप, युवासेना सह समन्वयक संदीप कोळंबे, उपशहर प्रमुख निलेश घरत, विनोद पांडे, उपशहर संघटक सुरेखा प्रधान, विभाग संघटक सामिया चौगुले, पंचायत समिती विभाग प्रमुख, चंद्रकांत ठाकरे, अविनाश भासे, पंचायत समिती संघटक दिनेश भासे, माजी सभापती प्रदीप ठाकरे, राकेश मरले, युवासेना पंचायत समिती समन्वयक अजय कराळे, शिवसैनिक प्रसाद डेरवणकर, भीम मुसळे, मंगेश गजमल, महेंद्र मोरे, रणजित शिंदे, सुमित चंदन, अक्षय ठाकरे, प्रमोद सावंत, पंकज गायकर, पंकज पवार यांच्या सह अनेक शिवसैनिक उपस्थित होते. सर्व पदाधिकाऱ्यांनी विजय उत्सव साजरा करत आणि एकमेकांना पेढे भरवत आनंद व्यक्त केला.

## रविवारी 'घराणा रंग' संगीत संवादात्मक कार्यक्रम

**पनवेलचे सुपूत्र पंडित उमेश चौधरी यांचे होणार शास्त्रीय गायन**

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नादब्रह्म परिवार बोरिवलीच्या वतीने रविवार दिनांक १३ नोव्हेंबर रोजी 'घराणा रंग' या संगीत संवादात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून यामध्ये पनवेलचे सुपूत्र सुप्रसिद्ध गायक पंडित उमेश चौधरी यांच्या शास्त्रीय गायनाची पर्वणी संगीत रसिकांना मिळणार आहे.



उस्ताद अझीम खान यांच्या संकल्पनेनुसार हा संगीत कार्यक्रम बोरिवलीतील प्रबोधनकार ठाकरे लघुनाट्यगृहात दुपारी ३. ३० वाजता होणार आहे. या संगीत उत्सवात पनवेल तालुका सांस्कृतिक सेलचे अध्यक्ष गीत सुरमयी व्यक्तिमत्व संगीत विशारद रायगड भूषण पंडित उमेश चौधरी यांचे शास्त्रीय गायन सादर होणार आहे. यावेळी त्यांना तबल्यावर किशोर पांडे व श्रीनिवास शेंबेकर यांची तर संवादिनीवर भक्ती ब्रहो घैसास यांची साथ लाभणार आहे. तसेच या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुप्रसिद्ध निवेदिका प्रा. विजया पाटील या करणार आहेत. वीस वर्षाच्या संगीत साधनेच्या कालावधीत पंडित उमेश चौधरी यांनी आपल्या अथक साधनेने गायन कलेवर प्रभुत्व निर्माण केले आणि या गायन तपस्येतून त्यांनी अनेक पुरस्कार, मानसन्मान, नामांकने मिळवली असून त्यांचा त्यांचे शास्त्रीय गायन रसिकांसाठी सुरमयी पर्वणी असते. त्यामुळे या कार्यक्रमाच्या प्रवेशिका किंवा अधिक माहितीसाठी जाळगावकर(९८२१४५७४७५), कोळी (९८२०४९४४०२) किंवा पाटील (९३२१३२७४०७) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन नादब्रह्म परिवाराच्यावतीने करण्यात आले आहे.

# शिवसेना नेते संजय राऊत यांना जामीन मिळताच उरणमध्ये शिवसैनिकांचा जल्लोष



**दै.रायगड नगरी । उरण**

शिवसेना नेते संजय राऊत यांना पीएमएलए कोर्टाने शंभर दिवसानंतर सुटका केल्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रात शिवसैनिकांनी जल्लोष केला. शिवसेना उरण तर्फे सुध्दा गुरुवार दिनाकं ०९ नोव्हेंबर २०२२ रोजी उद्धव बाळासाहेब ठाकरे (शिवसेना)पक्षाचे रायगड जिल्हाप्रमुख तथा माजी आमदार मनोहरशेठ भोईर यांच्या मार्गदर्शनाखाली व रायगड उपजिल्हाप्रमुख नरेश रहाळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेना उरण शहर शाखेजवळ फटाके फोडून व पेढे वाटून जल्लोष करण्यात आला.

यावेळी उरण शहरप्रमुख विनोद म्हात्रे, शहर संपर्कप्रमुख गणेश म्हात्रे, शहर संघटक दिलीप रहाळकर, नगरसेवक अतुल ठाकूर, नगरसेविका वर्षा पठारे, माजी नगरसेवक निलेश भोईर, शहर संघटिका मेघा मेस्त्री, अल्पसंख्याक सेलच्या शहर अध्यक्षा मुमताज भाटकर, तालुका अध्यक्षा हुसेना शेख, विधानसभा अध्यक्ष एजाज मुकादम, विभागप्रमुख संजय गावंड, शैलेश पंडित, अवजड वाहतूक सेनेचे चेतन म्हात्रे, धीरज बुंदे, युवासेनेचे नयन भोईर, संदेश पाटील, आशिष गोवारी, निखिल पाटील, संदीप पाटील, अरहम शेख, ग्राहक संरक्षण कक्षाचे अजय सुतार, संदिप जाधव, शाखाप्रमुख गुरुनाथ घरत, इस्माईल शेख, जेष्ठ कार्यकर्ते माणिक पाटील, नंदू पाटील, निजाय भाटकर, समीम खान, अरशद शेख, नबेल भाटकर, इम्रान खान, मोहम्मद शेख, शाहरुख गडी, हसीमा सरदार, रुक्सना सय्यद आदी उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# ट्रकच्या चाकाखाली येऊन तरुणाचा अपघाती मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल येथील साई वर्ल्ड पॅराडाईजच्या कार्निव्हल कार्यक्रमासाठी कुटुंबासह आलेल्या आणि मोटारसायकलवरुन भावासह कल्याण येथे परतणाऱ्या तरुणाचा ट्रकच्या चाकाखाली येऊन जागीच मृत्यू झाल्याची घटना तळोजा येथे घडली.

या अपघातानंतर ट्रक चालक पळून गेला आहे. सदर अपघातात मृत झालेल्या तरुणाचे नाव सय्यद आवेस इस्माईल (२२) असे असून तो कुटुंबासह कल्याणमध्ये राहण्यास होता. सय्यद आवेस आणि त्याच्या कुटुंबियांना पॅराडाईज ग्रुपच्या वतीने पनवेल येथे उभारण्यात येत असलेल्या साई वर्ल्ड पॅराडाईजमध्ये नवीन घर घ्यायचे होते. त्यामुळे आवेस आणि त्याचे कुटुंबिय पॅराडाईज ग्रुपच्या वतीने पनवेल येथे आयोजित करण्यात आलेल्या पॅराडाईज वर्ल्ड कार्निव्हलसाठी कल्याण येथून दोन मोटारसायकलवरुन पनवेल येथे आले होते. कार्यक्रम संपल्यानंतर आवेस आणि त्याचा लहान भाऊ मोहम्मद हुजेफा सय्यद मोटारसायकलवरुन पनवेल-मुंब्रा हायवेने शिळफाटाच्या दिशेने निघाले होते.

यावेळी पनवेल- मुंब्रा मार्गावरील आर. ए. एफ. सिग्नल जवळ पाठीमागून भरधाव वेगाने येणाऱ्या ट्रकने त्यांच्या मोटारसायकल धडक दिली. त्यामुळे आवेसचा भाऊ डाव्या बाजुला तर आवेस उजव्या बाजुला रस्त्यावर पडला. याचवेळी सदर ट्रकचे चाक आवेस याच्या डोक्यावरुन गेल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला.

# अज्ञात चोरट्यांनी केलेल्या घरफोडीत लाखोंचा ऐवज लंपास

**दै.रायगड नगरी । पनवेल**

बंद रूमच्या दरवाजाचे कुलूप कोणीतरी अज्ञात व्यक्तीने तोडून बेडरूममधील कपाटात ठेवलेले लाखो रुपये किमतीचे सोन्या चांदीचे दागिने व रोख रक्कम अशा मिळून जवळपास ३,८९,०००/- किमतीचा ऐवज चोरून नेल्याची घटना पनवेल शहरातील लोखंडी पाडा येथे घडली आहे . गीतांजली रासम ( वय ६५ ) रा. श्री सहयोग को. ऑप सोसायटी रूम नंबर २१० या बंद रूमच्या दरवाजाचे कुलूप कोणीतरी अज्ञात व्यक्तीने तोडून बेडरूममधील कपाटात ठेवलेले लाखो रुपये किमतीचे सोन्या चांदीचे दागिने व रोख रक्कम अशा मिळून जवळपास ३,८९,०००/- किमतीचा ऐवज चोरून नेल्याची घटना घडली आहे . याबातची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# खारघर मधील बारला भाजपाचा ठाम विरोध; 'भारतीय जनता पक्ष' पूर्णपणे नागरिकांच्या बाजूने

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर मधील सेक्टर १० येथे निरसुख पॅलेस या नव्या बार अँड रेस्टॉरंट या हॉटेलला दारूविक्रीची परवानगी मिळाल्यामुळे लोकांमध्ये जो क्षोभ निर्माण झालेला आहे, त्यामध्ये 'भारतीय जनता पक्ष' हा पूर्णपणे नागरिकांच्या बाजूने असून, खारघर मधील बारला भाजपाचा ठाम विरोध आहे, अशी स्पष्ट भूमिका आमदार प्रशांत ठाकूर यांनी घेतलेली आहे, असे प्रतिपादन भाजपचे खारघर शहर अध्यक्ष ब्रिजेश पटेल यांनी केले आहे.

नो लीकर झोन म्हणून ओळख असणाऱ्या खारघर शहरात निरसुख पॅलेस नामक एका नव्या बार अंड रेस्टॉरंटला उत्पादन शुल्क विभागाने दारूविक्रीची परवानगी दिली आहे, त्याला विरोध दर्शवत ब्रिजेश पटेल यांनी भाजपच्यावतीने ठोस भूमिका मांडली आहे. ब्रिजेश पटेल यांनी या संदर्भात बोलताना म्हंटले आहे कि, खारघर शहराला शैक्षणिक वारसा लाभलेला आहे. शहरामध्ये विविध माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालये अस्तित्वात असून खारघर शहराची नोंद नो लिकर झोन अशी अनेक वर्षांपासून आहे. खारघर मध्ये नागरिकांच्या मागणीनुसार गेली अनेक वर्षे दारूबंदी आहे व येथील भाजपाचे स्थानिक लोकप्रतिनिधी, नगरसेवक, आमदार यांनी सातत्याने जनभावनेचा आदर करत या दारूबंदीचे ठाम समर्थन केल्यानेच या विभागांत अनेक वर्षे दारूबंदी जपली गेली. एवढेच नव्हे तर पनवेल महानगरपालिकेत सत्ताधारी भाजपानेच सभागृहात पनवेल दारूमुक्तीचा प्रस्ताव मंजूर केला. परंतु नंतर प्रशासनाने योग्य पाठपुरावा न केल्याने योग्यप्रकारे त्या ठरावाची अंमलबजावणी झाली नाही. भारतीय जनता पक्षाने नेहमीच जनभावनेच्या आदर केला असून, याही वेळी भाजपा पूर्ण ताकदीने लोकांसोबत आहे. त्या अनुषंगाने या नवीन बार विरोधात् सामाजिक संघटना, स्थानिक नागरिक यांनी आंदोलन पुकारल्यास आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली लोकभावनेचा आदर करून भाजपा पूर्णपणे नागरिकांसोबत असेल, असे ब्रिजेश पटेल यांनी खारघरच्या नागरिकांना आश्वासित केले आहे.

## पनवेल महानगरपालिका
### शहर अभियंता विभाग
### जाहीर ई-निविदा सूचना

निविदा सुचना क्र.पमपा/बांधकाम/६१२२/प्र.क्र.०१/ /२०२२ दि. /११/२०२२

### शुद्धीपत्रक-१

| अ. क्र. | निविदा | कामाचे नाव |
|---|---|---|
| २ | PMC/CE/106/2022-23 | पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील मोकळ्या भूखंडासाठी सन २०२२ व सन २०२३-२४ या दोन वर्षाकरिता वार्षिक तत्वावर तारेचे कुंपण घालणे. |

या कामाच्या ई-निविदेच्या शुद्धीपत्रकाबाबतची माहिती शासनाच्या 'http://mahatenders.gov.in' या संकेतस्थळावर दि.११/११/२०२२ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**अतिरिक्त आयुक्त-I**
**पनवेल महानगरपालिका**

ॲड.मच्छिंद्रनाथ आत्माराम घरत

## जाहीर नोटीस

उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.२०८/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.९/१/२०२३

१) कै.किशोर शंकर पाटील
१/१) श्रीमती.किशोरी किशोर पाटील (पत्नी)
वय : ५७ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
१/२) श्री.प्रवीण किशोर पाटील (मुलगा)
वय : ३१ वर्षे, व्यवसाय : नोकरी
१/३) श्री.कुणाल किशोर पाटील (मुलगा)
वय : ४४ वर्षे, व्यवसाय : नोकरी
१/४) श्री.केतन किशोर पाटील (मुलगा)
वय : २८ वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा.वरील अर्जदार क्र.१/१ ते १/४
रा.मराठी स्कूल जवळ, बोकडविरा,
ता.उरण, जि.रायगड, पिन-४००७०२
२) कै.पुष्पा रघुनाथ मढवी (लग्नानंतरची)
उर्फ पुष्पा शंकर पाटील (मयत तर्फे वारस)
२/१) श्री.महेश रघुनाथ मढवी
वय : ४८ वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा.घर नं.२२, कवडे नगर, गणेश मंगल
कार्यालयाजवळ, पिंपळे गुरव, पुणे-४११०२७
२/२) श्री.शैलेश रघुनाथ मढवी
वय : ४४ वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा.घर नं.२२, कवडे नगर, गणेश मंगल
कार्यालयाजवळ, नवी सांगवी, पुणे-४११०२७
२/३) श्रीमती.हेमलता नितीन म्हात्रे (लग्नानंतरची)
उर्फ हेमलता रघुनाथ मढवी
वय : ३९ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.घर नं.२२, कवडे नगर, गणेश मंगल
कार्यालयाजवळ, नवी सांगवी, पुणे-४११०२७
३) श्रीमती.रशीला आत्माराम म्हात्रे (लग्नानंतरची)
उर्फ रशीला शंकर पाटील
वय : ३९ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.गणपती मंदिराजवळ, घर नं.८९४, नागाव,
ता.उरण, जि.रायगड, पिन-४००७०२
३) श्री.विलास शंकर पाटील
वय : वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा.बोकडविरा, ता.उरण, जि.रायगड, पिन-४००७०२
४) श्री.नंदकुमार शंकर पाटील
वय : ६१ वर्षे, व्यवसाय : सेवानिवृत्त
रा.आनंद नगर, रुम नं.१, बी विंग, ग्राऊंड फ्लोर,
ता.उरण, जि.रायगड, पिन-४००७०२
५) श्रीमती.जयवंती महादेव पाटील
उर्फ जयवंती शंकर पाटील
वय : ५१ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.ए ३०३, राम राजश्री, सी.एच.एस. लिमिटेड,
न्यू गोल्डन नेस्ट रोड, इंद्रलोक फेम-२,
भायंदर (पुर्व), ठाणे-४०११०५
६) श्रीमती.संगीता नरेश पाटील
उर्फ संगीता शंकर पाटील
वय : ५१ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.घर नं.४ बोकडविरा, ता.उरण,
जि.रायगड, पिन नं.४००७०२
७) श्रीमती.देवयानी दत्तात्रय म्हात्रे
उर्फ देवयानी शंकर पाटील
वय : वर्षे, व्यवसाय :
रा.मराठी शाळे मागे, सेक्टर २०,
नेरुळ रोड, इर्ड. स.ओ.ठाणे — अर्जदार

विरुद्ध

१) श्री.कै.हरिश्चंद्र बाळाराम पाटील (मयत तर्फे वारस)
१) हेमचंद्र हरिश्चंद्र पाटील
वय : ६२ वर्षे, व्यवसाय : नोकरी
२) श्री.नरेंद्र हरिश्चंद्र पाटील (मुलगा)
वय : ५२ वर्षे, व्यवसाय : नोकरी
३) श्रीमती.निर्मला चंद्रकांत पाटील (मयत तर्फे वारस)
उर्फ निर्मला हरिश्चंद्र पाटील
३/१) श्री.रंजीत चंद्रकांत पाटील
वय : ३५ वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा.बोकडविरा, ता.उरण, जि.रायगड
३/२) श्री.अमोल चंद्रकांत पाटील
वय : २८ वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा.बोकडविरा, ता.उरण, जि.रायगड
३/३) श्री.शोभना चंद्रकांत पाटील
वय : २६ वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा.केगाव आवेडा, ता.उरण, जि.रायगड
३/४) श्री.कुमार चंद्रकांत पाटील
वय : २४ वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा.बोकडविरा, ता.उरण, जि.रायगड
४) श्रीमती.गुलाब शांताराम पाटील
उर्फ गुलाब हरिश्चंद्र पाटील
वय : ५४ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
वरील सामनेवाला क्र.१ ते ४
रा.बोकडविरा, ता.उरण, जि.रायगड
५) श्रीमती.रेवती किशोर घरत
उर्फ रेवती हरिश्चंद्र पाटील
वय : ४८ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.कोहिनूर मिळ, चाळ नं.९,
वडाळा, मुंबई, पिन-
६) श्रीमती.चित्रा महेंद्र घरत
उर्फ चित्रा हरिश्चंद्र पाटील
वय : ४६ वर्षे, व्यवसाय :
रा.करंजा, ता.उरण, जि.रायगड
७) श्रीमती.बेबी हरिश्चंद्र पाटील
वय : ४२ वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा.बोकडविरा, ता.उरण, जि.रायगड — सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै.ठकीबाई शंकर पाटील यांचे निधन दि.११/०३/१९८४ रोजी मौजे : बोकडविरा, ता.उरण, जि.रायगड येथे झाले आहे. वरील अर्जदार आणि सामनेवाले हे कै.ठकीबाई शंकर पाटील यांचे कायदेशीर वारस आहेत. कै.ठकीबाई शंकर पाटील यांच्या सामाईक नावे खालील वर्णनाची मिळकत महाराष्ट्र शासनाने सिडकोकरिता भूसंपादीत केलेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : बोकडविरा, ता.उरण, जि.रायगड**

| अ.क्र. | गावाचे नाव/युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १ | बोकडविरा १०६/८७ | ८ | २ | ०-१२-५ |

वरील मिळककतीमध्ये जर दिलेले अर्जदार क्र.१ ते ८ आणि सामनेवाले क्र.१ ते ७ हे कै.ठकीबाई शंकर पाटील यांचे वारस असून त्यास आणखी कोणीही वारस नाहीत. अर्जदार यांनी आपणास सदर कामी वारस असल्याचा दाखला मिळावा म्हणून ना.कोर्टात प्रस्तुतचा अर्ज दिलेला आहे. तरी अर्जदार यांच्या वारस असल्याच्या हक्काबद्दल कोणीही व्यक्तीस हरकत द्यायची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर वकीलामार्फत न्यायालयात हरकत न घेतल्यास ना.कोर्ट तत्संबंधी योग्य पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाही.

आज दि.०९/११/२०२२ रोजी सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी सदरची जाहीर नोटीस दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.क.स्तर, उरण**

कोर्टाचा शिक्का

**सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.क.स्तर, उरण**